पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८, लेखा विभाग,
क्र.लेखा/९२ /काවि/५० /२०१६
दि. ९ / ८ /२०१६

# परिपत्रक

विषय :- मृत्यू नि- सेवा निवृत्ती उपदान नामनिर्देशन पत्र नमुना १ व २ चे आधारे मृत्यू उपदान व कुटूंब निवृत्ती वेतन मंजुरी बाबत.

संदर्भ :- १) पिं.चिं.म.न.पा. कर्मचारी महासंघाच्या मागण्या संदर्भात मा. आयुक्तसो. यांचे कडे झालेली बैठक दि.२१/७/२०१६
२) लेखा विभागाकडील परिपत्रक क्र. लेखा/पेन्शन/३२/२९८/२०१३ दि. ३१/७/२०१३.

२/- शासकीय कर्मचारी सेवेत किंवा पदावर प्रथमत: कायम झाल्यानंतर त्या प्रकरणातील परिस्थितीनुसार समुचीत असेल त्याप्रमाणे नमुना १ किंवा नमुना २ मध्ये नामनिर्देशन पत्रान्वये आपला वारस निश्चित करून त्याद्वारे आपले मृत्यूचे पश्चात ( सेवा निवृत्ती उपदान / मृत्यू उपदान) देय असलेली रक्कम मिळण्याचे हक्क एका किंवा अधिक व्यक्तिंना प्रदान करू शकतो अशी निवृत्ती वेतन नियमात तरतुद आहे.

अशी नामनिर्देशित पत्रे प्रत्येक कर्मचा-यांकडून ( वर्ग १ ते ४) दोन प्रतीत भरून घेऊन कर्मचा-यांच्या सेवानोंद पुस्तकामध्ये वैद्यकीय प्रमाणपत्रासोबत लावणे कामी संदर्भिय परिपत्रकान्वये सर्व विभागांना वारंवार लेखा विभागा मार्फत संबधितांना कळवूनही विभागां मार्फत त्यांची दखल घेतली गेलेली नाही असे दिसून आले आहे. सेवेत असताना मयत झालेल्या कर्मचा-यांची प्रकरणे ज्यावेळी मृत्यू उपदान / कुटूंब निवृत्ती वेतन मंजुरीकामी इकडील विभागास प्राप्त होतात, त्यावेळेस मयत कर्मचा-यांनी भरून दिलेली नामनिर्देशन पत्रे (नमुना १/२) सेवानोंद पुस्तकात लावलेला दिसून येत नाही. त्यामुळे ब-याच प्रकरणांमध्ये मृत्यू उपदान मंजुरी कामी अडचणी निर्माण झालेमुळे वारस निश्चिती कामी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन)' नियम १९८२ पोटनियम ११४ नुसार न्यायालयाकडील उत्तराधिकारी प्रमाणपत्र (Succession Certificate) मागविणे भाग पडते व त्यामुळे बरीच प्रकरणे प्रलंबित राहतात. तसेच कर्मचा-यांच्या निधनानंतर काही प्रकरणांमध्ये एकापेक्षा जास्त व्यक्तींकडून मृत्यू उपदान / कुटूंब निवृत्ती वेतनासाठी हक्क प्रस्तावित केले जातात. त्यामुळे न्यायालयातुन Succession Certificate मागविणे शिवाय पर्याय रहात नाही व न्यायालयाकडील प्रक्रिया या अत्यंत गुंतागुंतीच्या असतात तसेच त्या प्रदिर्घ काळ चालणा-या असतात. त्यामुळे ख-या वारसास त्याचा मनस्ताप सोसावा लागतो व आर्थिक झळही सोसावी लागते.

तथापि नामनिर्देशन पत्रे महाराष्ट्र नागरीसेवा ( निवृत्ती वेतन) नियम १९८२ पोट नियम ११४ मधील तरतुदीनुसार कर्मचा-यांने हयात असतानाच आपल्या पश्चात मृत्यू-नि-सेवा उपदानाची मिळणारी रक्कम कोणास व किती प्रमाणात द्यावी या बाबतचे **नामनिर्देशन पत्र अधिकार प्रदान अधिका-यांचे स्वाक्षरीने पुर्णपणे भरून** दिलेस ते विधीग्राह्य धरून त्याच्या आधारे वारसांना मृत्यू उपदानाची रक्कम तसेच कुटूंबनिवृत्ती वेतन मंजुर करणे सुलभ होते.

दि. २१/७/२०१६ रोजी मा. आयुक्तसो. यांचे कडे पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघाच्या मागण्यासंदर्भात बैठक झाली सदरचे बैठकीमध्ये उपरोक्त विषयावर मा. आयुक्तसो यांचेशी चर्चा झालेली आहे. तरी सदर परिपत्रकान्वये सर्व विभागप्रमुखांना पुनःश्च सुचित करणेत येते की, आपले विभागामधील ज्या, निवृत्तीवेतन योजनेस पात्र कर्मचा-यांची नामनिर्देशन पत्रे/ कुटूंबाचा तपशील पत्रे भरलेली नाहीत त्यांची नामनिर्देशन पत्र विनाविलंब भरून घेऊन त्यावर संबंधित अधिकारी यांनी स्वाक्षरी करून एक प्रत संबधितांचे सेवानोंद पुस्तकात लावून त्याची दुसरी प्रत कर्मचा-यांचे व्यक्तीगत नस्ती मध्ये ठेवणेत येवून त्याची नोंद **सेवानोंद पुस्तकात लालशाईने विभागप्रमुखांचे स्वाक्षरीने घेणेत यावी.** व विभागातील सर्व कर्मचा-याची नामनिर्देशन पत्र भरून घेतले बाबतचा पुर्तता अहवाल विभागातील कर्मचा-यांच्या एकूण संख्येसह व कर्मचा-यांचे नावांनिशी लेखा विभागास दि. ३१/८/२०१६ पुर्वी सादर करावा. ज्या विभागांचा प्रस्तुत अहवाल मुदतीत सादर होणार नाही त्या विभागाचे माहे ऑगस्ट २०१६ चे मासिक वेतन बिल लेखा विभागाने अदा करू नये.

तथापि माहे ऑगस्ट २०१६ पासून लेखा विभागास प्राप्त होणा-या निवृत्ती वेतन प्रकरणासोबत त्यांची मृत्यू-नि-सेवा उपदान नामनिर्देशनपत्रे (नमुना १ किंवा २), भविष्य निर्वाह निधी नामनिर्देशन तसेच गट विमा नामनिर्देशन इ. उपलब्ध होणार नाहीत अशा प्रकरणी न्यायालयाकडून Succession Certificate प्राप्त झाले नंतर व न्यायालयाच्या आदेशानुसार रकमा अदा केल्या जातील व त्याकामी होणा-या विलंबास संबधित विभाग जबाबदार राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८

प्रत :-

१) सर्व शाखाप्रमुख,
---------------------विभाग,
२) पिं.चिं.म.न.पा. कर्मचारी महासंघ
माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.